महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय खलनिग्रहणाय

# सायबर गुन्हे कक्ष

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), मिरा,भाईंदर-वसई,विरार यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Mail ID :- cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट :- /२०२१** दिनांक -१०/१०/२०२१

## "SIDD COVID HELP" या नावाने सोशल मिडीयाद्वारे कोविड व इतर गंभीर आजारांवरील औषधे उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन देवुन फसवणुक करणा-या ईसमावर सायबर गुन्हे कक्षाची कारवाई.

सायबर गुन्हे शाखा येथे ई मेल व्दारे दिनांक ०६/०९/२०२१ रोजी तक्रारदार श्री राहुल रामगोपाल खंडेलवाल वय-४० वर्षे, यांचा तक्रार अर्ज प्राप्त झालेला होता. अर्जामधील तक्रारीची थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदार यांचे आईचे उपचाराकरीता रुपये ४४,०००/- किमतीचे TOCILIZUMBA injection 800 mg हे इंजेक्शन मिळविण्याकरीता त्यांनी सोशल मिडीयावर विनंती संदेश प्रसारीत केला होता, त्यावरुन आरोपीत इसमाने तक्रारदार यांना संपर्क साधून तक्रारदार यांना TOCILIZUMBA injection 800 mg हे औषध मिळवून देण्याचे आश्वासन देवून त्यांचा विश्वास संपादन केला व तक्रारदार यांचेकडून रुपये ४४००/- अॅडव्हान्स दिनांक ०१/०९/२०२१ रोजी मित्राचे खात्यावर वर्ग करुन घेतले, अश्या प्रकारे फसवणुक केलेली होती.

सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने तांत्रीक तपास करुन आज दिनांक ०९/१०/२०२१ रोजी सायबर सेल पथकाने संशयित इसम - **सिध्दार्थ कैलास बारी वय-२६ वर्षे पत्ता – रुम नं. ५०४, सी ०१, नवकार सिटी फेज-०२, डॉन बॉस्को स्कुलजवळ, नायगांव पुर्व, ता.वसई,जि.पालघर मुळ राहणार – नवलगड,झुन-झुनु जि. झुन-झुनु राज्य- राजस्थान यास ताब्यात घेतले, तसेच त्याचेकडे केलेल्या तपासामध्ये त्याने खालील मोबाईल क्रमांक/बँक खाते क्रमांक गुन्हा करण्यासाठी वापरले असल्याची माहिती दिली.**

| Mobile Numbers | Bank A/c No. |
|---|---|
| **1.** 8928172546,<br>**2.** 7506176483,<br>**3.** 9309316453,<br>**4.** 9004118157 | 1. State Bank Of India Acc No - 33141137236 IFSC CODE SBIN<br>2. HDFC Acc No - 50100235232556 IFSC CODE HDFC0000543<br>3. Devlopment Bank Of Singapore -881032738186<br>4. UPI ID – siddaaaaaaaaaa@dbs, 8928172546@paytm<br>**5.** PAYTM – 918928172546 IFSC Code – PYTM0123456 |

वरील मोबाईल नंबरवरुन गरजू लोकांना औषधोपचाराकरीता आवश्यक असलेले वेगवेगळे इंजेक्शन उपलब्ध करुन देतो असे सांगुन सदर इंजेक्शनची अनामत रक्कम त्याचेकडील वरील नमुद वेगवेगळ्या बँक खात्यामध्ये स्विकारुन जनतेची फसवणूक करीता होता. तसेच लोकांची फसवणूक करण्याकरीता **Twitter account "SIDD_COVID HELP"** असे बनविलेले आहे.

सदर आरोपीत यास पुढील कायदेशीर कारवाई करीता **अचोळे पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन आरोपी विरोधात गुन्हा नोंद क्रमांक १६/२०२१ भादंविसं कलम ४२० अन्वये नोंद करण्यात आला आहे.**

तसेच नमुद आरोपी याचेकडे केलेल्या तपासामध्ये त्याने केलेला खालील नमुद गुन्हा उघडकीस आणण्यात आलेला आहे.

१) **तिलक मार्ग पोलीस ठाणे, नवी दिल्ली गुन्हा नोंद क्रमांक ००८८/२०२१ भादंविसं कलम ४२० अन्वये दिनांक २७/०५/२०२१**

**सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, Twitter account "SIDD_COVID HELP" तसेच वरील मोबाईल क्रमांक व बँक खात्यांशी संबधित व्यवहार करुन औषध/इंजेक्शन मिळवून देण्याच्या नावाखाली फसवणुक झालेली असल्यास नजीकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा.**

सदरची कारवाई श्री.डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे शाखा येथील पो.नि. सुजितकुमार गुंजकर, सपोनि प्रविण स्वामी, पोउपनि संतोष भिसे, पोउपनि प्रसाद शेनोलकर, सफौ/संतोष चव्हाण, पो.शि. १८१२/ प्रविण आव्हाड, पोशि/२०७२ गणेश इलग, मपोशि/२५३१ सुवर्णा माळी, मपोशि/२१९३ पल्लवी निकम यांनी केली आहे.

----